## आजचा शुभ विचार

“माणसाला दारिद्र्याची नव्हे तर त्याच्या दुर्गुणांची लाज वाटली पाहिजे."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!








मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-31 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thuesday 03 June 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ३१ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ मंगळवार, दि. ०३ जुन २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये


# कार्यकर्त्यांनो तयारीला लागा!

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या हालचाली सुरू, निवडणूक आयोगाने दिले महत्त्वाचे निर्देश.


ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत


-----------------------



राज्यातील रखडलेल्या महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांची प्रतीक्षा अखेर संपण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या चार आठवड्यांत अधिसूचना जारी करण्याच्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने हालचाली सुरू केल्या असून, प्रभाग रचनेसाठी राज्य सरकारला सूचनाही दिली आहे.

राज्यात सध्या बहुतेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासकीय राजवट लागू आहे. यामुळे लोकप्रतिनिधींचा सहभाग नसेलली ही यंत्रणा केवळ अधिकारी वर्गाच्या ताब्यात आहे. सर्वोच्च न्यायालयाने मागील महिन्यात स्पष्ट आदेश देत, 4 महिन्यांच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी आणि त्याआधी चार आठवड्यांत अधिसूचना जाहीर करावी, असे निर्देश दिले होते. त्यानुसार निवडणूक आयोगाने निवडणुका घेण्यासाठीच्या हालचालींना वेग आणला आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात प्रभाग रचनेचा अधिकार राज्य सरकारने स्वत:कडे घेतला होता. परिणामी, आता निवडणूक आयोगाने प्रभाग रचना पूर्ण करण्याची जबाबदारी पुन्हा राज्य सरकारवर सोपवली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, प्रभाग रचनेची प्राथमिक प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात असून, याच आठवड्यात ती माहिती आयोगाकडे सादर होण्याची शक्यता आहे.

### प्रभाग रचनेनंतर हालचाली होणार सुरू...

राज्य सरकारकडून माहिती मिळताच, त्या आधारे प्रभागांचे आरक्षण आणि मतदार याद्या अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू होईल. प्रभाग रचना, आरक्षण व मतदार याद्या हे तीन महत्त्वाचे टप्पे पूर्ण झाल्यानंतरच प्रत्यक्ष निवडणुकांची घोषणा होणार आहे.

### निवडणुका कधी होणार?

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने आयोगाला निवडणूक प्रक्रियेसाठी मुदतवाढ देण्याची मुभा दिली आहे. सध्याच्या परिस्थितीत ही संपूर्ण प्रक्रिया सप्टेंबरच्या आत पूर्ण करणे कठीण असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे आयोग ऑक्टोबरमध्ये निवडणुका घेण्यासाठी न्यायालयाकडे मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करू शकतो.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ऑक्टोबरमध्ये दोन टप्प्यांत घेतल्या जाण्याची शक्यता आहे. यासंदर्भात अंतिम निर्णय पुढील आठवड्यांत अपेक्षित आहे. राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या या निवडणुकांकडे सर्वच पक्षांचे लक्ष लागून राहिले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर या निवडणुका होणार आहेत. त्याशिवाय जवळपास सगळ्याच महत्त्वाच्या महापालिका, नगरपालिकांसह जिल्हा परिषदांच्याही निवडणुका होणार आहेत. त्यामुळे या निवडणुका 'मिनी विधानसभा' निवडणुका असणार आहेत.

# वैष्णवी हगवणे प्रकरणाला नवं वळण

## सासू आणि नवऱ्याला आणखी एका गुन्ह्यात अटक


अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत


---------------------



वैष्णवी हगवणे आत्महत्याप्रकरणात आणखी एक मोठं वळण आलं आहे. वैष्णवी हगवणेचा नवरा शशांक हगवणे आणि सासू लता हगवणे यांच्यावर आता आणखी एका गुन्ह्यात अटक होणार आहे. येरवडा तुरुंगात असलेल्या या हगवणे आई-लेकावर म्हाळुंगे पोलीस अटकेची कारवाई करणार आहे. वैष्णवी हगवणे प्रकरणात नवीन खुलासे होत असताना आता दुसरीकडे हगवणे माय-लेकाचं आणखी एक कांड समोर आलं आहे. शशांक हगवणे आणि लता हगवणे यांच्यावर फसवणुकीचा गंभीर आरोप झाल्यानंतर त्यांच्याविरोधात आता नव्या गुन्ह्यांमध्ये कारवाई होत आहे. म्हाळुंगे पोलिसांनी दोघांना अटक करण्यासाठी न्यायालयाची परवानगी मिळाली आहे. लवकरच येरवडा कारागृहातून त्यांना ताब्यात घेतले जाणार आहे. या दोघांवर जेसीबी मशीनच्या विक्रीवेळी प्रशांत येळवंडे यांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. यासंदर्भात येळवंडे यांनी म्हाळुंगे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. हगवणे माय-लेकाने जेसीबी मशीन विक्रीच्या व्यवहारात खोटे आश्वासन देऊन आर्थिक फसवणूक केली. या तक्रारीवर न्यायालयात सुनावणी झाली. सुनावणीनंतर न्यायालयाने शशांक आणि लता हगवणे यांना अटक करण्याची परवानगी दिली. खेड तालुक्यातील नियोजे गावचे रहिवासी प्रशांत येळवंडे यांनी लता हगवणे आणि शशांक राजेंद्र हगवणे यांच्याविरोधात तब्बल 1 1 लाखांची फसवणूक झाल्याची तक्रार दाखल केली. मार्च 2022 मध्ये प्रशांत येळवंडे यांनी लता हगवणे आणि शशांक हगवणे यांच्याकडून एकूण 24 लाख रुपये किंमतीचा जेसीबी खरेदी करण्याचा व्यवहार केला होता. सुरुवातीला पाच लाख रुपये रोख देऊन त्यांनी जेसीबी ताब्यात घेतला. परंतु त्यानंतर लक्षात आले की या जेसीबीवर आधीच इंडसइंड बँकेचे 1 9 लाखांचे कर्ज आहे. हा मुद्दा समोर आल्यानंतर दोन्ही पक्षांमध्ये दरमहा 50 हजार रुपये हप्ते देण्याचा तडजोडीचा करार झाला. त्यानुसार येळवंडे यांनी एकूण 6 लाख 70 हजार रुपये लता हगवणे यांच्या खात्यावर जमा केले. मात्र, या रकमेचा वापर कर्जफेडीसाठी न करता हगवणे कुटुंबाने स्वत:साठी केला, असा आरोप आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'कॉमन मॅन- पोलीस शिल्पा'चे अनवारण संपन्न


शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत


-------------------------





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शहरातील पोलीस उपायुक्त कार्यालय, झोन-१ नाशिक येथील 'कॉमन मॅनपोलीस शिल्पा'चे अनावरण करण्यात आले. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, आमदार सीमा हिरे, आमदार राहुल ढिकले, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, पोलीस आयुक्त नाशिक संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव, सहाय्यक पोलिस आयुक्त नितीन जाधव, कारागीर मोतीराम पवार, लक्ष्मण आतारकर, पोलीस शिपाई विशाल पवार यांच्यासह पोलीस अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. सामान्य माणूस व पोलीस यांच्यातील संबंध अधिक दृढ व्हावेत, अशी कॉमन मॅन-पोलीस शिल्पाची संकल्पना आहे. या शिल्पाच्या सुशोभीकरणासाठी बसविण्यात आलेला दगड घडविण्याचे पवार व आतारकर यांनी केले आहे.


अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या

दैनिक स्वराज्यदूत

या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी

आजच संपर्क करा ८४४६६७३६७७


# 'चक्र' च्या माध्यमातून संशोधन, नवाचार आणि स्टार्टअपला बळ मिळेल: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस


शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत


-----------------------------------





विद्यापीठे ही केवळ शिक्षणसंस्था आणि अभ्यासक्रम नियोजन करणारी संस्था ठरू नये तर संशोधन, नवाचार आणि स्टार्ट अप सुरू करणारी केंद्रे व्हावीत. त्यादृष्टीने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने सुरू केलेले उत्कृष्टता केंद्र आणि कंपनी कायद्यांतर्गत सुरू केलेले 'चक्र' ( सेंटर फॉर हेल्थ, अप्लाइड नॉलेज अँड रिसर्च ऑटोनॉमी) हे उपयुक्त ठरेल. आताच्या उपक्रमातून सामान्य माणसाला ज्या गोष्टी उपलब्ध होत नाहीत त्या गोष्टी त्यांना उपलब्ध करून देणारी व्यवस्था यामधून निर्माण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे उत्कृष्टता केंद्र 'चक्र' चे भूमिपूजन आणि संकेतस्थळाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांचे हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरिष महाजन, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ (दूरदृष्यप्रणाली द्वारे), शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य विभागाचे मंत्री नरहरी झिरवळ, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे आयुक्त राजीव निवतकर, नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम, विद्यापीठाच्या कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त), प्रति-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने वैद्यकीय शिक्षणात चांगली प्रगती केली आहे. प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय असावे असा विचार असून गेल्या २ वर्षात शासकीय १० नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरू केली आहेत. आरोग्य विज्ञान विद्यापीठाने गेल्या २५ वर्षात चांगले काम केले आहे.

### वैद्यकीय संशोधनाला चालना देण्यासाठी विद्यापीठांनी मार्गदर्शन करावे:

परदेशी विद्यापीठे ज्याप्रकारे काम करतात, तसेच काम येथील विद्यापीठांनी करावे. विद्यापीठात संशोधनाला चालना मिळणे गरजेचे आहे, वेगवेगळ्या विषयांचे संशोधन केंद्र म्हणून विद्यापीठांनी काम केले पाहिजे. उत्कृष्टता केंद्र, ईन्क्यूबेशन केंद्र, स्टार्ट अप आणि विविध क्षेत्रात मार्गदर्शन करणारी केंद्रे म्हणून त्यांनी काम केले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले. देशात नवीन शिक्षण धोरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आणले. समाजाची गरज आणि रोजगाराभिमुख शिक्षणाचा धोरणात अंतर्भाव करण्यात आला आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाने सुरू केलेलं 'चक्र' हे त्याचेच उदाहरण असल्याचे फडणवीस म्हणाले.

### सामान्य माणसाचे आरोग्य जपणारे संशोधन व्हावे:

'चक्र'सारखे मॉडेल आणि हब अँड स्पोक ही पद्धती महत्वाची आहे. मागच्या काळात आरोग्य विज्ञान विद्यापीठाने नागपूर आयआयएम सोबत आदिवासी आरोग्य क्षेत्रात चांगले काम केले. आताच्या उपक्रमातून सामान्य माणसाला ज्या गोष्टी उपलब्ध होत नाहीत त्या गोष्टी त्यांना उपलब्ध करून देणारी व्यवस्था निर्माण होणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. जगातल्या विद्यापिठाप्रमाणेच आपली विद्यापीठे स्वयंपूर्ण होत आहेत. त्यासाठी असे प्रयोग गरजेचे आहेत. वैद्यकीय क्षेत्रात तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात आले आहे. मोठे बदल होत आहेत. नवे तंत्रज्ञान येत आहे. अशावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील पायभूत सुविधांचा लाभ सामान्य माणसाला झाला पाहिजे. राज्यातील १३ कोटी नागरिकांच्या आरोग्याची काळजी आपण घेत आहोत. त्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि तालुकास्तरीय उपकेंद्रांनी या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात महत्वाची भूमिका पार पाडली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. असे केल्यास खऱ्या अर्थाने जिल्हास्तरीय यंत्रणांना संशोधन आणि इतर बाबीकडे लक्ष देता येणे शक्य होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### विद्यापीठाने आरोग्यदायी कुंभ संकल्पना राबवावी:

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिकमध्ये येत्या काळात सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने डिजिटल कुंभ सोबतच आरोग्यदायी कुंभ अशी संकल्पना राबवून यामध्ये योगदान द्यावे. विद्यापीठाच्या प्रत्येक उपक्रमात राज्य शासनाच्यावतीने पूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विद्यापीठाच्या १५० दिवसांच्या कृती आराखडा पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी विद्यापीठाने केलेल्या उपक्रमांबाबत आणि चक्र विषयक माहिती प्रदर्शनाला भेट देऊन पाहणी केली. प्रास्ताविकात कुलगुरू लेफ्टनन्ट जनरल श्रीमती कानिटकर यांनी प्रधानमंत्री यांच्या विकसित भारत संकल्पानुसार विद्यापीठाने काम सुरू केले असल्याचे सांगून चक्र आणि उत्कृष्टता केंद्र निर्मितीबाबतची माहिती दिली.

संपादकीय

# कोकणातील रानमेवा अवकाळी पावसामुळे रानातच

एप्रिल-मे महिना म्हणजे कोकणात चाकरमान्यांची लगबग... मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आदी शहरांमध्ये नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने जे बाहेर असतात असे सारे कोकणात आपल्या मूळ गावी येतात. या चाकरमान्यांच्या आगमनाने कोकणातील गावखेडी गजबजलेली असतात. कोकणातील बंद घरे चाकरमान्यांच्या वास्तव्याने महिनाभरासाठी उघडी दिसतात. तशी गावातील वाडी-वस्तीतही लोकांची ये-जा सुरू असते. एप्रिल-मे महिना लग्न सोहळे, गावातील ग्रामदेवतांचे वर्धापन दिन, गावचे उत्सव, कोकणातील ग्रामदेवतांच्या मंदिरातील महाप्रसाद असं सारं उत्सवी वातावरण असतं. कडक उन्हाळ्यातही ग्रामदेवतेच्या उत्सवात प्रत्येक गावकरी आपल्या कुटुंबासह सहभागी असतो. कडक उन्हाळा, काही गावातून जाणवणारी पाणीटंचाई असं सगळं वातावरण असलं तरीही कोकणवासीय मात्र आपला आनंद मित्रपरिवार, नातेवाईक यांच्या विवाह सोहळ्यात, वास्तुशांतीच्या कार्यक्रमातून शोधत असतो. त्यात कोकण रमलेलं असतं. आंबा, काजू, कोकम, करवंद, जांभुळ कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांच्या स्वागतास तयार असतात; परंतु यावर्षी आंबा, काजू यांच पीक कमी झालं. काजू 'बी' चा दर सर्वसाधारणपणे स्थिर राहिला; परंतु हवामानाच्या सततच्या परिणामाने पिकावर आणि उत्पादित झालेल्या काजू 'बी'वर त्याचा परिणाम झाला. काजू 'बी'वर काळपट थर जमा झाला. साहजिकच काजू बागायतदार शेतकऱ्यांची मेहनत वाढली. काजू 'बी' साफसफाई केल्याशिवाय विक्रीला देता येणारी नव्हती. आंब्याची स्थिती यापेक्षा वेगळी नव्हती. सुरुवातीला हापूस आंब्याचा दर चांगला होता; परंतु बदलत राहणारे हवामान आणि अवकाळी पाऊस यामुळे साहजिकच आंबा शेवटच्या टप्प्यात आंबा बागायतदार शेतकऱ्याच्या हातून निसटला. एकतर यावर्षी आंबा उत्पादनही फारच कमी प्रमाणात झाले. कोकणातील स्थानिक बाजारपेठातून कोकणातील हापूस आंबा गायब झाला आहे. कोकणातील आंबा बागायतदार शेतकऱ्याकडे आंबाच नाही. त्यामुळे बाजारपेठामध्ये कोकणाबाहेरचा आंबा विक्रीला दिसत आहे. कोकणात भरणारा आठवडा बाजार आणि गावठी बाजारात कोकणातील झाडी आंबा येऊ लागला आहे. मात्र, कोकणात रायवळ आंब्याची जुनी झाडही गावातून दुर्मीळ होत आहेत. यामुळे कोकणात पूर्वी गोरगरीब कुटुंबांना मे महिन्यात आधार वाटणारा रायवळ आंबा दिसेनासा झाला आहे. पूर्वीची आंब्याची झाड जपली जात नाहीत आणि नव्याने कोणीही रायवळ आंब्याची लागवडही करत नाही. यामुळे साहजिकच कोकणच वैशिष्ट्यपूर्ण असलेला रायवळ आंबा अस्तित्वहीन होत चालला आहे. कोकम हे कोकणच आणखी एक खास वैशिष्ट्य आहे. कोकमची सोलकढी आज अगदी महाराष्ट्रातच नव्हे तर जगाच्या बाजारपेठेतही मानाने जेवणाच्या ताटात मिरवताना दिसते. कोकमला यावर्षी दरही चांगला होता; परंतु कोकमच उत्पादनही कमी आहे. कोकमला मेहनत आहे. आता कोकणात इतकी मेहनत करून कोकणातील या कोकमच विविध प्रकार करण्यात पुरेस मनुष्यबळही उरलेले नाही. दुसरी गोष्ट कोकणात कोकम लागवड ज्याला फार कमी मेहनत असते. ती कोकम लागवड व्हायला हवी होती. परंतु ती लागवड म्हणावी त्या प्रमाणात झाली नाही. कोकम लागवड मोठ्या प्रमाणात कोकणात झाली असती तर त्याचा फायदाही कोकणातील शेतकऱ्याला होऊ शकला असता. परंतु यातही काही भागात मात्र शेतकऱ्यांनी कोकमची स्वतंत्र बागायत केल्याचे सकारात्मक दृश्यही पाहायला मिळतं. याचं प्रमाण फार कमी असलं तरीही कोकणातील काही मोजक्या शेतकऱ्यांनी प्रायोगिकतेत प्रयत्न तर केले आहेत. जांभुळ यावर्षीही कोकणच्या बाजारात फार कुठे दिसले नाही. कोकणातील जांभुळ पुणे, मुंबईच्या बाजारात पाठवले जाते. त्याला मागणीही मोठ्या प्रमाणात आहे; परंतु जांभुळ लागवडीच्या बाबतीतही कोकणात उदासीनताच पाहायला मिळते. जांभुळ लागवड करून त्याचा बागायत म्हणून आजवर कोणी फारसा विचार केलेला नाही. दुसरी बाब जांभुळ, करवंद याबाबतीत कोकणकृषी विद्यापीठ आजही उदासीनच आहे. यामुळेच जांभुळ, करवंदांकडे कृषी विद्यापीठाने त्याकडे आपलं लक्ष वळवलेलं नाही. कोकणची काळी मैना म्हणून या करवंदांचा उल्लेख सर्वत्र होतो. कोकणातील ही करवंद डोंगर-दऱ्यांमध्ये असतात. रानात दिसणारी ही करवंद पूर्वी बाजारात विक्रीला यायची. कोकणात येणारा चाकरमानीही शेताच्या बांधावर काटेरी झुडपात होणारी करवंद सहकुटुंब या करवंदाचा आस्वाद घ्यायचा, चांदवड्याच्या पानाचा तयार केलेला खोला. त्यात आपण स्वत: करवंदांच्या झाळीवरून काढलेली करवंद ती खाण्यात एक वेगळीच मजा असते. हा आनंद ज्यांनी अनुभवला असेल निश्चितच नुसत्या कल्पनेनेही त्यांना ते जुने दिवस आठवल्यावाचून राहणार नाहीत. यावर्षी या अशा सर्व आनंदावर विरजणच पडले आहे. कोकणात पाऊस सुरू झाला. सुरुवातीला हा पाऊस एकच दिवस वाटला; परंतु तसे घडले नाही. तो रोज संध्याकाळी, सकाळीही पाऊस पडू लागला. यामुळे साहजिकच कोकणातील रानमेवा लोकांपर्यंत पोहोचण्यापूर्वी रानातच राहिला. यामुळे जशी जांभुळ, करवंद लोकांना त्याची फारशी चव चाखायलाही मिळाली नाही. यामुळे यावर्षी अवकाळी पावसाने कोकणात उत्पादित होणाऱ्या सर्वच फळांच्या बाबतीत काहीशी अशीच स्थिती आहे. फणसाचं उत्पादन यावर्षी चांगलं झालंय. यामुळे कोकणातील मुंबई-गोवा महामार्गावर कोकणातील फणस विक्रीला असलेला दिसतो. कापे आणि रसाळ या दोन प्रकारात असणाऱ्या फणसांना दोन्ही प्रकारात फार मोठी मागणी आहे. मात्र, यातही कापा फणस बाजारात फार मोठ्या प्रमाणात विक्रीला असतो. याचं एक सहज आठवलेलं उदाहरणही सांगतो. सिंधुदुर्गात २००९ मध्ये राज्य मंत्रिमंडळाची बैठक होती. या राज्य मंत्रिमंडळ बैठकीला सर्व मंत्रीगण उपस्थित होते. त्यावेळच्या मंत्रिमंडळ बैठकीसाठी राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजितदादा पवार उपस्थित होते. तेव्हा अजितदादा पवार राज्याचे अर्थमंत्री होते. त्यावेळच्या जेवणामध्ये स्वीट डीश म्हणून कापे गरे होते. अजितदादांनी कापे गऱ्याची तेव्हा खास फर्माइश केली. अगदी कापे गरे पॅकिंगमधूनच मागितले होते. त्यामुळे कोकणातील या काप्या गऱ्यांची स्वादिष्टताही वेगळीच आहे. कोकणातील हे सारं निसर्ग निर्मित फळ यावर्षी पावसाने मात्र त्याचा स्वाद तर बिघडलाच; परंतु लोकांपर्यंत येण्यापूर्वीच रानातच राहिला.

# आम्हीच इथले भाई", हडपसरमध्ये कोयता गँगचा राडा; भर रस्त्यात कोयते उगारुन दगडफेक

अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

शिक्षणाचं माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात गुन्हेगारीचं प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढल्याचं चित्र आहे. खून, मारमारी अन् दरोडा यांसारख्या घटनेत वाढ होत असल्याना आता हडपसर भागातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. हडपसर भागातील रामटेकडी परिसरात टोळक्याने कोयते उगारुन दगडफेक केली आहे. दगडफेकीत दोन महिला जखमी झाल्या असून वानवडी पोलिसांनी एका गुन्हेगाराला अटक केली आहे. युवकांकडून कोयते उगारुन, दगडफेक करुन दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

हडपसर भागातील रामटेकडी परिसरात टोळक्याने कोयते उगारुन दगडफेक करत




आम्हीच इथले भाई असे म्हणत दहशत माजविली. टोळक्याने केलेल्या दगडफेकीत दोन महिला जखमी झाल्या असून वानवडी पोलिसांनी एका गुन्हेगाराला अटक केली आहे. महेश विकास शिंदे (वय 20, रा. रामटेकडी, हडपसर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी प्रेम उर्फ पिट्या थोरात (वय 21), दुर्वेश उर्फ बल्ल्या गायकवाड (वय 18), अरविंद उर्फ नक्या माने (वय 18), नितीन पाटोळे (वय 18), ओंकार देढे (वय 20), चेतन बावरी (वय 19, सर्व रा. रामटेकडी, हडपसर) यांच्यासह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शनिवारी रात्री झाली दगडफेक

टोळक्याने केलेल्या दगडफेकीत नीलावती सतीश देडगे (वय 50), अनिता विश्वजीत ठोसर (वय 38) जखमी झाल्या आहेत. याबाबत संतोष छबुराव सुपेकर (वय 45, रा. रामटेकडी, हडपसर) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना शनिवारी 31 मे रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास रामटेकडी परिसरात घडली.

### आरोपी विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी

पुण्यात आता कोयता गँग नवीन राहिली नाही. हातात कोयता तसेच बांबू स्टिक असल्याने परिसरातील नागरिक चांगलेच धास्तावले होते. त्यामुळे पुणेकरांच्या सुरक्षेवर अनेक प्रश्न उपस्थित होताना दिसत आहे. तसेच पोलिसांच्या कार्यक्षमतेवर देखील प्रश्न उपस्थित होताना दिसत आहेत. आरोपी विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# पळसाच्या पानाची पत्रावळ, एक लोक चळवळ, पर्यावरणाची संजीवनी

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------






काळाच्या ओघात आणि आधुनिकतेच्या लाटेत अनेक सुंदर परंपरांना नामशेष होण्याच्या मार्गावर असताना , धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील काही गावकऱ्यांनी मात्र एक अनोखा आदर्श घालून दिला आहे, एकेकाळी लग्न समारंभ पासून ते विविध जेवणावळीचे शान असलेल्या, मात्र कालांतराने लोक पावलेल्या पळसाच्या पानाच्या पत्रावळी स्थानिक भाषेत इस्तरी पुन्हा पंगतीत दिसू लागल्या आहेत. हि केवळ एक परंपरा जपणे नाही, तर पर्यावरणाच्या रक्षणाचे एक लोकचळवळच बनली आहे. गेल्या अनेक वर्षा पासून जेवणाच्या पगतीतून पळसाच्या पानाच्या पात्रावळी हद्दपार झाल्या होत्या. त्यांची जागांवर फायबर प्लास्टिक कागदी आणि पृष्ठाच्या चकमकीत परंतु आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी घातक असलेल्या आधुनिक पत्रावळींनी घेतली होती. पळसाच्या हिरव्यागार पानावर जेवण करणे हे केवळ रुचकर नव्हे तर, पौष्टिकही मानले जात असे.मात्र, प्लास्टिकच्या पत्रावळीमुळे जेवणाची मूळ चव तर हरविच , पण वापरल्यानंतर फेकल्या जाणाऱ्या या पत्रावळी चघळणाऱ्या गुरानाही गंभीर आरोग्य समस्याना सामोरे जावे लागेल कचऱ्याचा ढिग वाढत गेला आणि पर्यावरणाचा समतोल बिघडला.

सामूहिक प्रयत्नांचे स्फूर्तीदायी उदाहरण परंतु , साक्री तालुक्यातील बारीपाडा, मोहगाव, चावडी पाडा यासारख्या गावांनी या नकारात्मक प्रवाहाला छेद दिला आहे. इथल्या ग्रामस्थांनी एकत्र येऊन, एकमेकांच्या सहकार्याने पळसाच्या पानाच्या पत्रावळी बनवण्याची परंपरा पुन्हा सुरू केली आहे. ज्याच्या घरी लग्न असते, त्याच्या अंगणातच सर्व गावकरी एकत्र येतात. जंगलातून ताजी हिरवीगार पळसाची पाने आणली जातात आणि त्या पानापासून मोठा कौशल्याने हाताने पत्रावळी तयार केली जातात.हि केवळ एक पत्रावळ नसते, तर त्याचा सामुहीक श्रमाची, एकोप्याची आणि पर्यावरणावरील प्रेमाचे भावना गुंफलेले असते. यामुळे केवळ जेवणाचा स्वादिष्टपणाचा वाढत नाही , तर पिढ्यांना पिढ्या चालत असलेल्या संस्कृतीचे जतन होते आणि गावांमध्ये एक सोलोख्याचे वातावरण निर्माण होते. तालुकाच्या पश्चिम पट्ट्यात, जिथे पळसाची झाडे मोठ्या प्रमाणावर आढळतात, तिथे पानाची सहज उपलब्धता आहे. सध्या लग्नसराई सुरू असताना. अनेकदा पावसाळयामुळे उद्भवणाऱ्या अडचणीवर मात करत, हि ग्रामस्थ मंडळी ही परंपरा उत्साहाने पुढे नेत आहेत. लग्न समारंभासाठी आवश्यक असलेल्या साहित्यात इस्तरी अर्थात पत्रवळीची जमावाजमव हि एक महत्वाची बाब असते.

मोहगाव, एक प्लास्टिक मुक्त आदर्श या लोक चळवळीचे एक उत्तम उदाहरण म्हणजे मोहगाव.हे गाव प्लास्टिक मुक्त गाव म्हणून नावाने रूपाला येत आहे. येथे प्लास्टिकच्या वापरावर पूर्णपणे बंदी आहे. गावात ठिक ठिकाणी प्लास्टिक मुक्त झोपड्या, तयार करण्यात आल्या आहेत, जिथे प्लास्टिकच्या वस्तू दिसल्यास त्या जमा केल्या जातात. या गावात ज्या कुटुंबात विवाह सोहळा असतो, ते ग्रामस्थांना कळवतात आणि मग सर्व गावकरी मिळून जंगलातून ताजी पळसाची पाने आणतात आणि त्यापासून पत्रावळी तयार करतात. लग्नाच्या दिवशी या पत्रावळीतच सर्वांना जेवण दिले जाते, ज्यामुळे केवळ जेवणाचा आनंदच व्दिगुणीत होत नाही, तर प्लास्टिक मुक्त जीवनाचा संदेशही दिला जातो. मोहागावचा युवा उमेश देशमुखचा उत्साहाने सांगतो, माझ्या लग्नात गावकऱ्यांच्या सहकार्याने आम्ही हजाराहून आधिक पळसाच्या पानाच्या पत्रावळी इस्तरी तयार केल्या आणि त्यांच् पत्रावळीत आम्ही सर्व पगतीना जेवन दिले. हा अनुभव खरच अविस्मरणीय होता. हे केवळ एक बातमी नाही, तर सामूहिक इच्छाशक्ती, निसर्गात प्रति आदर आणि पारंपारिक मूल्याचे जतन याचे एक प्रेरणादायी उदाहरण आहे. पळसाच्या पानाच्या पात्रावळीचा हा पुनर्जन्म, आधुनिकतेच्या अंधानुकरणा मुळे हरवत चाललेल्या अनेक चांगल्या गोष्टींना पुन्हा जीवनदान देऊ शकतो, असा विश्वास निर्माण करतो.या गावांनी घालून दिलेला आदर्श इतरांनाही पर्यावरणाचे रक्षण करत, आपल्या संस्कृतीचे जतन करण्याचे प्रेरणा देईल अशी आशा आहे.

# जग स्तिमित होईल, असाच कुंभमेळा होणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------




कुंभमेळा सुरक्षित, निर्मळ आणि पवित्र वातावरणात होण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी निधीची उपलब्धता करून देण्यात येईल. कुंभमेळा भारतीय सनातन संस्कृतीचे प्रतीक असल्याने संपूर्ण जगाचे लक्ष याकडे आहे. त्यामुळे सर्वांच्या सहकार्याने जग स्तिमित होईल असे भव्य दिव्य आणि स्मरणीय आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्यातील अमृत स्नानाचे दिवसही मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सिंहस्थ कुंभमेळा पूर्वतयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार सीमा हिरे, आमदार राहुल ढिकले, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. साधू-महंतांच्या उपास्थितीत कुंभमेळयाच्या तारखांची घोषणा होणे ही खऱ्या अर्थाने कुंभपर्वाची सुरूवात आहे, असे नमूद करू मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कुंभमेळ्याचे संचलन आखाडे, साधू -महंत करतात, राज्य शासन सेवक म्हणून अधिकाधिक चांगली सुविधा देण्याचा प्रयत्न करते. यावेळी देखील शासनातर्फे उत्तम सुविधा उभारण्यात येतील. कुंभमेळ्याबाबत साधू महंतांचा अनुभव मोठा आहे, त्यामुळे त्यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल. २०१५ मध्ये तयारीसाठी कालावधी कमी होता. यावेळी पूर्व तयारीसाठी अधिक कालावधी असल्याने शासन चांगली तयारी करीत आहे. गोदावरी निर्मळ राहावी आणि कायम प्रवाही राहावी हेच कुंभचे उद्दिष्ट असून तसा शासनाचा प्रयत्न आहे. गोदावरीचे पावित्र्य अबाधित राखण्यासाठी उपायोजना करण्यात येत आहेत. गोदावरीत जाणारे पाणी स्वच्छ असावे यादृष्टीने सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी निविदा काढण्यात येत आहेत. नदी पात्रात अशुद्ध पाणी जाऊ नये असे प्रयत्न करण्यात येतील. नदी प्रवाहित राहिल्यास शुद्ध राहील, त्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे कुंभ आणि त्यानंतरही गोदावरीचे जल निर्मळ राहील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. साधू-महंतांच्या सूचना लक्षात घेवून शासन आवश्यक नियोजन करेल, असे नमूद करतांना फडणवीस पुढे म्हणाले, आखाड्यासाठी आवश्यक सुविधा उपालब्ध करून देण्यात येतील. साधूग्रामची जागा कायमस्वरूपी उपयोगात यावी यासाठी जमिन अधिग्रहित करण्यात येईल. कुंभमेळ्यासाठी शहरात रस्त्याचे जाळे तयार करण्यात येत आहे. कुशावर्त येथे गर्दी होऊ नये यासाठी योग्य नियोजन करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे जन्मस्थान असलेल्या चौंडीच्या विकासासाठी ६८१ कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यांनी तयार केलेल्या घाटांचे संवर्धन करण्यात येत आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथेदेखील उत्तम सुविधा उभारण्यात येतील. त्यासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. भाविक आणि साधू – महंतांची सुरक्षितता महत्वाची असल्याने नियोजन करतांना सुरक्षा विषयक उपाययोजनांना प्राधान्य देण्यात यावे, अशी सूचना त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविकात विभागीय आयुक्त डॉ. गेडाम म्हणाले, यावेळी सिंहस्थ कुंभमेळ्यात अधिक भाविक येण्याची शक्यता असल्याने गर्दी नियंत्रणाचे मोठे आव्हान असणार आहे. तीन अमृत स्नानसोबत इतर पर्वस्नान होणार आहेत. कुंभमेळ्याची कामे वेगाने सुरू असून ४ हजार कोटींपेक्षा अधिक कामाच्या निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. लवकरच २ हजार ६०० कोटींच्या निविदा काढण्यात येणार आहेत. ही सर्व कामे जानेवारी २०२७ पूर्वी पूर्णत्वास येतील. या कामांसाठी सर्व आखाड्यांचे चांगले सहकार्य मिळत आहे. सर्वांच्या सहकार्याने यंदाचा नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा चांगला आणि सुरक्षित होईल. इथे येणाऱ्या साधू-महंतांना सुखद आणि पावन अनुभव येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी विविध आखाड्याच्या साधू-महंतांनी कुंभमेळा आयोजनाबाबत सूचना केल्या. यावेळी श्री रामानंद निर्मोही आखाडा, निर्मोही अनी आखाडा, श्री दिगंबर अनी आखाडा, निर्वाणी अनी आखाडा श्री पंचायती उदासीन आखाडा, श्री पंचायती नया उदासीन आखाडा, श्री पंचायती निर्मल आखाडा, श्री पंचायती अटल आखाडा, श्री पंचायती महानिर्वाणी आखाडा, श्री पंच अग्नी आखाडा, यांच्यासह विविध आखाड्यांचे पदाधिकारी, नाशिक पुरोहित संघाचे अध्यक्ष सतीश शुक्ल, पुरोहित संघाचे त्र्यंबकेश्वर येथील अध्यक्ष मनोज थेटे आदी उपस्थित होते.

प्रारंभी सर्व साधू, महंतांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे मंत्रोच्चारात स्वागत केले. तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व साधू, महंतांचे शासनातर्फे स्वागत केले.

### नाशिक कुंभमेळा तारखा:

**सिंहस्थ ध्वजारोहण शुभारंभ:**

शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६, दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी (स्थळ-रामकुंड पंचवटी)

**प्रथम अमृतस्नान:** सोमवार २ ऑगस्ट २०२७,आषाढ सोमवती अमावस्या.

**महाकुंभस्नान/द्वितीय अमृतस्नान:** मंगळवार ३१ ऑगस्ट २०२७, श्रावण अमावस्या

**तृतीय अमृतस्नान:** शनिवार ११ सप्टेंबर २०२७, भाद्रपद शुद्ध एकादशी

### त्र्यंबकेश्वर कुंभमेळा:

**सिंहस्थ ध्वजारोहण शुभारंभ:**

शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६,

**प्रथम अमृतस्नान:** सोमवार २ ऑगस्ट २०२७, आषाढ सोमवती अमावस्या.

**महाकुंभस्नान/द्वितीय अमृतस्नान:** मंगळवार ३१ ऑगस्ट २०२७, श्रावण अमावस्या

**तृतीय अमृतस्नान:** शनिवार १२ सप्टेंबर २०२७, भाद्रपद शुद्ध द्वादशी (वामन द्वादशी).

याशिवाय नाशिक येथे सिंहस्थ पर्व पर्वकालातील सर्व एकादशी, पौर्णिमा, अमावस्या वैधृती व्यतिपात योग हे दिवस भाविकांसाठी तीर्थस्थान, दर्शन पर्व असतील. नाशिक येथे कुंभमेळा २०२७ मध्ये मुख्य तीन पर्वण्याव्यतिरिक्त पर्वस्नानाचे एकूण ४४ मुहूर्त असून त्र्यंबकेश्वर येथे पर्वस्नानाचे एकूण ५३ मुहूर्त आहेत. भाविकांनी अमृत स्नानाशिवाय पर्वस्नानाचा दिवशी देखील मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी केले

# हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग यांनी देशहिताच्या दृष्टीने सत्य बाजू मांडली

देशाच्या भोवताल भारत विरोधी जाळे विणले आहे यात मुख्य भूमिका चीनची असुन चीनच्या मदतीने पाकिस्तान, बांग्लादेश हे देश नेहमीच काहीतरी कुरापती निर्माण करीत असतातच. कारण यांना भारताचा विकास पहावत नाही. त्यामुळेच सिमावर्ती भागात आपल्याला आतंकवादी कारवाया मोठ्या प्रमाणात दिसून येतात.आज संपूर्ण जग अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहे.त्या अनुषंगाने भारताचीही संपूर्ण तयारी सुध्दा आहे आणि त्या दिशेने जात आहे यात दुमत नाही.परंतु जेव्हा देशाच्या सुरक्षेचा प्रश्न येतो तेव्हा आपल्या जवळ संपूर्ण अत्याधुनिक सामुग्री असने गरजेचे असते.परंतु आपण जेव्हा कोणत्यांही देशा सोबत किंवा देशातील कंपनी सोबत कोणत्याही शस्त्रांचा करार यासाठी केला जातो की आपल्याला माहीत असते की या वस्तू किंवा सामग्री ठराविक वेळेपर्यंत आपल्याजवळ उपलब्ध होईल.परंतु असे होत नसल्याचे स्पष्ट दिसून येते.त्यामुळे हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंह यांनी उपस्थित केलेला प्रश्न अत्यंत वाजवी आणि देश हिताचा आहे असे मला वाटते. कारण देशाच्या १४० कोटी जनतेच्या सुरक्षा कवचचा प्रश्न, देशाच्या सिमावर्ती भागाचा प्रश्न आणि सैन्य शक्तीचा प्रश्न महत्त्वाचा आहे त्यामुळे कोणत्याही सुरक्षा व्यवहारामध्ये कोणत्याही प्रकारच्या करारामध्ये हयगय किंवा दिरंगाई झाली तर त्याचे प्रायश्चित्त देशाला व देशातील नागरिकांना गंभीर स्वरूपात भोगावे लागु शकतात. त्यामुळे देशाच्या सुरक्षिततेच्या बाबतीतील कोणताही करार असो तो तंतोतंत व सटीक असायला हवा यात कोणत्याही प्रकारची हयगय किंवा विलंब नकोच.भारताच्या संरक्षण खरेदी प्रकल्पांना सातत्याने होणाऱ्या विलंबाबद्दल हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी दिनांक २९ मे २०२५ ला भारतीय उद्योग महासंघाची (सीआयआय) वार्षिक शिखर परिषद दिल्लीत झाली.यावेळी हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग बोलत होते.यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी, सीआयआयचे अध्यक्ष संजीव पुरी, डीआरडीओ चे अध्यक्ष डॉ.समीर कामत आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.करारांमधील अवास्तव कालमर्यादांवर आणि कामगिरीतील कमतरतांवर स्पष्टपणे बोलण्याचे धारिष्ट्य न दाखवणाऱ्या संरक्षण अधिकाऱ्यांवरही यावेळी एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी टीका केली व सर्वांच्या उपस्थितीत एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी तीव्र चिंता व्यक्त केली.ते म्हणतात की अनेकदा आम्हाला करार करतांना माहीत असते की संबंधित प्रणाली कधीच येणार नाही.असा एकही प्रकल्प मला आठवत नाही जो वेळेवर पुर्ण झाला आहे. आपण असे आश्वासन का देतो,जे साध्य करता येत नाही?या शब्दात हवाई दलप्रमुखांनी आपली नाराजी व्यक्त केली. माझ्यामते हवाईदल प्रमुखांची नाराजगी देशहिताच्या दृष्टीने वाजवी असल्याचे मी समजतो.विशेषत: स्वदेशी प्रकल्पांशी संबंधित असलेल्या अनेक संरक्षण प्रणालीच्या विलंबाकडे हवाई दलप्रमुखांनी यावेळी लक्ष वेधले हलक्या लढाऊ विमानांच्या (एलसीए) प्रकल्पाचा संदर्भ देत ते म्हणाले,तेजस एमके १ए या लढाऊ विमानांसाठी फेब्रुवारी २०२१ मध्ये "हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड" सोबत (एचएएल) ४८ हजार कोटी रुपयांचा करार करण्यात आला.करारानुसार या विमानांचे वितरण मार्च २०२४ पासून अपेक्षित होते.मात्र मागणी केलेल्या ८३ पैकी एकाही विमानाचे वितरण करण्यात आलेले नाही.ही देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत चिंताजनक बाब आहे.कारण ज्या विमानांचे उत्पादन आपल्याला भारतातच करायचे आहे आणि आपण कराराचे पालन करीत नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे.यावर प्रधानमंत्री, राष्ट्रपती व रक्षा मंत्रालयाने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व विलंब का होत आहे याचीही चौकशी व्हायला पाहिजे व सरकारने "हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड" ला जाब विचारायला पाहिजे की आपण कराराची पुर्तत: का केली नाही? याकरीता "हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड" ला दंडीत सुध्दा करायला पाहिजे आणि भविष्यात कोणत्याही प्रकारच्या कराराच्या बाबतीत दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही अशा पध्दतीचा नोटीस सरकारने "हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड"ला बजावला पाहिजे.कारण देशाच्या सुरक्षिततेच्या प्रश्न आहे यात कोणत्याही प्रकारची तडजोड नकोच.देशांतर्गत किंवा विदेशांतर्गत कोणत्याही प्रकारचा करार असो त्याची पुर्तता वेळेवरच झाली पाहिजे तेव्हाच त्याला योग्य करार समजल्या जाईल.ऑपरेशन सिंदूर बद्दल बोलताना हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग म्हणतात ऑपरेशन सिन्दुर चा राष्ट्रीय विजय म्हणून गौरव केला आणि ही मोहीम अंमलात आणण्यासाठी सर्व सैन्य दलांनी एकत्र येऊन काम केल्याचे सांगितले.ही बाब सत्य आहे की ऑपरेशन सिन्दुर हा राष्ट्रीय विजय आहे.त्यामुळे मी राजकीय पुढाऱ्यांना विनंती करतो की ऑपरेशन सिन्दुर बद्दल राजकारण न करता राष्ट्रीय विजय समजले पाहिजे.सरकारला विनंती करतो की रक्षा कराराच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा विलंब किंवा दिरंगाई सरकारने खपवून घेवू नये.यामुळे देशाला मोठे नुकसान होवू शकते.हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी भारतीय उद्योग महासंघाच्या व्यापार शिखर परिषदेत अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करून सरकारला जागे केले आहे याकरीता सरकारने त्यांचा सन्मान करायला पाहिजे पुढील कारवाईसाठी कठोर पावले उचलली पाहिजेत.सरकारने आतातरी अमर प्रीत सिंग यांच्या वक्तव्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढील संपुर्ण कराराचे व व संरक्षण खरेदी प्रकल्पांचे तंतोतंत पालन करून यात कोणतीही दिरंगाई होणार नाही याची जातीने काळजी घ्यावी यातच खरे देश हित आहे.सन्माननीय हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी देशाच्या जनतेपुढे जी सत्यता मांडली ही बाब देश कधीच विसरणार नाही.त्याकरीता त्यांना कोटी-कोटी प्रणाम,जय हिंद, जय भारत!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**नागपूर**
**(महाराष्ट्र राज्य)**

# भारतीय किसान संघाचा ग्राम समिती कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------




भारतीय किसान संघ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचाराने चालणारी देशातली एकमेव सर्वात मोठी शेतकऱ्यांची संघटना असून देशामध्ये या संघटनेचे एकूण महिला पुरुष मिळून 45 लाख सभासद आहे भारतीय किसान संघटनेची रचनाही ग्राम पातळीपासून सुरू होते तर ती राष्ट्रीय पातळीपर्यंत असून ग्राम समितीला विशेष महत्त्व असते आणि म्हणून ग्राम समितीमध्ये असलेल्या सदस्य व ग्राम समिती कार्यकारणी तिला सदस्यांचे प्रशिक्षण व्हावे या हेतूने साक्री तालुक्याच पिंपळनेर विभागीय प्रशिक्षण कार्यक्रम राजे छत्रपती इंग्लिश मीडियम स्कूल पिंपळनेर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाला भारतीय किसान संघाचे प्रांत मंत्री सुभाष महाजन , संभाजी अहिरराव ,राणा पाटील ,कार्यकारणी सदस्य साहेबराव पवार ,जिल्हा सहमंत्री प्रा. डॉ. सुरेश अहिरे, जिल्हा प्रसिद्धी आणि प्रचार प्रमुख प्रा. शिवप्रसाद शेवाळे , विभागीय जैविक शेती समन्वय दुल्हाब जाधव ,जिल्हा कार्यकारणी सदस्य विश्वास अहिरराव उर्फ रावसाहेब काका मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साक्री तालुका भारतीय किसान संघाचे अध्यक्ष ए पी दशपुते सर होते ,सदर कार्यक्रम हा चार सत्रात घेण्यात आला उद्घाटन सत्रात भगवान बलराम व भारत मातेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले .त्यानंतर प्रथम सत्राचे मार्गदर्शन प्रा. शिवप्रसाद शेवाळे यांनी भारतीय किसान संघाची मूळ संकल्पना या विषयावर भारतीय किसान संघाची माहिती उपस्थित ग्राम समिती कार्यकर्त्यांना दिली. त्यानंतर दुसऱ्या सत्रात एकात्मिक ग्राम विकासाची संकल्पना या विषयावर बारीपाडा गावचे व भारतीय किसान संघाचे प्रांत सदस्य साहेबराव पवार यांनी गाव खेड्याचा विकास कशा पद्धतीने करता येतो हे बारीपाड्याचे उदाहरण देत सविस्तर मार्गदर्शन केले .कार्यक्रमाच्या तिसऱ्या सत्रामध्ये प्रा. डॉ.सुरेश अहिरे यांनी भारतीय किसान संघाच्या रेती रिती भाती या विषयावर मार्गदर्शन केले .त्यानंतर चौथ्या सत्रात दुल्लभ जाधव यांनी भारतीय किसान संघाचे चार उत्सवाच्या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले .कार्यक्रमाचा समारोप भाषणात प्रांत मंत्री सुभाष महाजन यांनी भारतीय किसान संघाच्या कार्याचे विविध आयाम स्पष्ट केले शेवटी अध्यक्षीय भाषणामध्ये ए पी दसपुते यांनी भारतातील शेतकरी संघटित झाल्याशिवाय कुठलीही समस्या सुटणार नाही त्यामुळे संघटन महत्वाचे असून ग्राम समिती पासून आपण संघटना वाढवूया व आपल्या मागण्या सरकारकडून मान्य करून घेऊ यात असे सांगितले. आभार डॉ. सुरेश अहिरे यांनी मानले .यावेळी तालुका कार्यकारणी सदस्य अरविंद भदाणे ,तालुका उपाध्यक्ष गोकुळ शेलार ,जिल्हा उपाध्यक्ष शांताराम शिंदे ,तालुका कार्यकारणी सदस्य धनराज पाटील ,तालुका महिला कार्यकारणी सदस्य छाया वाडेकर, तालुका कार्यकारणी सदस्य दीपक सोनवणे देशीरवाडे ग्राम समिती अध्यक्ष राजेंद्र सोनवणे पिंपळनेर ग्राम समितीचे अध्यक्ष जगदीश गांगुर्डे , मंत्री सुभाष जगताप, बल्हाने ग्राम समिती प्रमुख अध्यक्ष भाऊराव भिका बिरारीस, जेबापूर ग्राम समिती मंत्री उमाकांत भदाणे ,प्रतापपूर ग्राम समिती अध्यक्ष डॉ ठाकरे ,दहिवेल ग्राम समिती अध्यक्ष संजय कालेश्वर बच्छाव उपस्थित होते. या प्रशिक्षण वर्गास पिंपळनेर ,जेबापूर ,बोपखेल, डांगशीरवाडे ,बल्हाने दहिवेल ,प्रतापूर ,दिघावे देशीरवाडे, ककानी ,येथील ग्राम समिती कार्यकर्ते प्रशिक्षणास उपस्थित होते .एकूण 3 4 कार्यकर्त्यांनी प्रशिक्षण वर्गात सहभाग घेतला

# पणन उपसंचालकांची ढोलबारे मार्केटला भेट, पायाभूत सुविधा आणि कामकाजाचे केले कौतूक

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------



खाजगी कृषी बाजार समित्या ह्या शेतकऱ्यांसाठी स्पर्धात्मकरित्या हितकारक ठरत आहेत की नाही, याची पडताळणी तसेच या बाजार समित्यांवर शासनाचा अंकुश असावा, या बाजार समित्या कृषि अधिनियमातील तरतुदींनुसार कामकाज करत आहेत की नाही याची पडताळणी व्हावी यासाठी पणन मंत्र्यांनी संबंधित विभागातील वरिष्ठांची बैठक घेऊन खाजगी बाजार समित्यांची प्रत्यक्ष बाहणी आणि पडताळणीचे निर्देश अलिकडे दिले होते. त्यानुसार पणन संचालकांनी बागलाण तालुक्यातील बाजार समित्यांच्या पडताळणीसाठी उपसंचालक श्रीमती अलका पवार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती.

या समितीच्या प्रमुख सौ. पवार होत्या, तर इतर सदस्य म्हणून सहकार सहायक निबंधक प्रतिनिधी आणि तालुका लेखापरिक्षक हे होते. या समितीने दि. २ जून रोजी खाजगी कसमादे शेतकरी कृषी उत्पन्न बाजार, ढोलबारे या कृषि बाजाराला प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी पणनच्या पथकाने प्रत्यक्ष लिलाव प्रक्रिया समजून घेतली, त्याबरोबरच बाजार समितीमधिल असणाऱ्या पायाभुत सुविधा त्यामध्ये लिलाव शेड, बाजार क्षेत्र, CCTV यंत्रणा, प्रसाधन गृह, सुचना यंत्रणा, विवाद निवारण यंत्रणा, आवक-जावक नोंद, खरेदी व शेतकरी पेमेंट पद्धत, अनुज्ञप्ती अधिकृतता, खाजगी बाजाराचे व्यवहार, नोंदवह्या, शासनाची देखरेख फी व त्याची नियमितता, कामकाजाचे स्वरुप, कर्मचारी व जबाबदारी, ढोलबारे मार्केटच्या वतिने मोफत देण्यात येणारा अल्पोपहार, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शेतकऱ्यांसाठी विश्रांतीगृह, माथाडी कामगारांसाठी उभारण्यात आलेले विश्रांतीगृह, राबविण्यात आले◌ेले वेगवेगळे सामाजिक उपक्रम याची या पथकाने प्रत्यक्ष पाहणी-पडताळणी केली.

ढोलबारे मार्केटने जोपासलेले शेतकरीकेंद्री चोख आणि पारदर्शक व्यवहार, पायाभूत सुविधांचा दर्जा, कार्यालय सुसज्जता, शेतकरी केंद्रबिंदू म्हणून चाललेले कामकाज या सर्व बाबींचे पणन उपसंचालक श्रीमती अलका पवार यांनी कौतूक केले. पथकातील सदस्य, लेखापरिक्षक गुप्ते, सहायक निबंधक प्रतिनिधी सतिष पाटकर यांनी या पाहणीत पणन उपसंचालक यांना सहकार्य केले.

यावेळी खाजगी कसमादे शेतकरी कृषी उत्पन्न बाजार ढोलबारे चे सभापती सुरेश नाना पवार, सचिव गणेश पवार, उपसचिव प्रा. अमोल बच्छाव यांच्याशी पणन विभागाच्या पथकाने सविस्तर चर्चा केली व आवश्यक ते निर्देश दिले. शेतकरी कार्य समिती सदस्य मयुर नेरकर, कार्यालय व्यवस्थापक किरण अहिरे, माथाडी प्रमुख प्रविण मराठे, कर्मचारी व शेतकरी याप्रसंगी उपस्थित होते..

# एसटीला देशात क्रमांक एकची परिवहन संस्था करण्याचे ध्येय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------




प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्याबरोबरच कर्मचाऱ्यांना देखील आर्थिक दृष्ट्या सक्षम करणाऱ्या एसटीला देशातील क्रमांक एकची परिवहन संस्था निर्माण करणे हेच ध्येय असेल! असे प्रतिपादन परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले. ते एसटीच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त यशवंत नाट्य मंदिर येथे आयोजित केलेल्या नाविन्यपूर्ण योजनांचा शुभारंभ आणि गौरव पुरस्कार सोहळ्यानिमित्त बोलत होते. या वेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय डॉ माधव कुसेकर एसटीचे सर्व वरीष्ठ अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की गेली ७७ वर्ष ऊन, वारा पाऊस याची तमा न बाळगता चांद्यापासून बांद्यापर्यंत आणि गाव खेड्यापासून आदिवासी पाड्यापर्यंत समाजातील सर्व घटकांना सातत्याने प्रवासी सेवा देण्याचं काम एसटीने अविरतपणे केलेल आहे. भविष्यात एसटी आपला शतकोत्तर महोत्सव निश्चित पूर्ण करेल! कारण महाराष्ट्रातल्या सर्व सामान्य जनतेचा आशीर्वाद आणि पाठबळ एसटीला मिळालेल आहे. ७५ वर्षांपेक्षा जास्त काळ टिकून राहिलेल्या खूप कमी संस्था देशात अस्तित्वात आहेत. अर्थात, एसटी महामंडळ त्यापैकी एक आहे. आज ७७ वर्षानंतर देखील महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील एसटीचे महत्त्व यत किंचितही कमी झालेलं नाही. त्यामुळे " लोकाश्रय " लाभलेली आपली एसटी भविष्यात अशीच मार्गक्रमण करत राहील, असा मला विश्वास वाटतो. भविष्यात दळणवळण क्षेत्रात होणारे संभाव्य बदल लक्षात घेता प्रवाशांना अधिक सुरक्षित आणि स्वच्छ अशी " स्मार्ट एसटी " उपलब्ध करून देण्याचा आपला मानस आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले. यावेळी " बस फॉर असं " या एसटीप्रेमी संस्थेने तयार केलेले गेल्या ७७ वर्षातील एसटीचा प्रवास चित्रमय रित्या दाखवण्यात आलेले *एसटीचा वाहननामा* हे कॉफी टेबल पुस्तक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. यावेळी एसटीतील सर्वोत्कृष्ट अधिकाऱ्यांचा "अध्यक्ष सुवर्णपदक" देऊन गौरव करण्यात आला. त्यामध्ये धुळे -नंदुरबार विभागाचे विभाग नियंत्रक विजय गीते साक्री आगाराचे आगार व्यवस्थापक सुनील महाले , धुळे -नंदुरबार विभागाचे यंत्र अभियंता पंकज महाजन, यांचा मंत्री सरनाईक यांच्या हस्ते सुवर्ण पदक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

# महाराष्ट्राची रक्तवाहिनी लालपरी आणि एस टी महामंडळ यांचा 77 वा वर्धापन दिन सिन्नर आगारात उत्साहात साजरा

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------




१ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्रासोबत नाशिक जिल्ह्यातील सिन्नर आगारात एस टी महामंडळाचा ७७ वा वर्धापन दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला त्यासाठी प्रथम कार्यशाळा येथे सजावट करून पूजन करन्यात आले त्याच बरोबर सिन्नर बस स्थानकात नारळाची खुंट हार फुलांनी सजावट करण्यात येऊन बस चे पूजन व केक कापण्यात आला प्रसंगी आगार व्यवस्थापक हेमंत नेरकर स्थानक प्रमुख सुरेश पवार वाहतूक निरीक्षक भरत शेळके ,जयवंत चोपडे स वा नि अण्णा पवार कार्यशाळा प्रमुख श्री गांगुर्डे साहेब दिगंबर पुरी सोपान ओढेकर देवा सांगळे सोमा पगार संतोष दुबे दत्ता चव्हाण नागेश पारखे स्वप्नील नवले एस एस पवार संतोष दुबे आर डी चौरे वैशाली शिंदे TDF चे संचालक अधिकारी श्री कापडे साहेब व सर्व सहकारी उपस्थितीत होते कार्यशाळा कर्मचारी यांनी सजावटी साठी अथक परिश्रम केले

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

